# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
☏ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४, E-mail : ropune.dte@gmail.com

तात्काळ/फॅक्सद्वारे

जा.क्रं.विकापु/आस्था-१/परिपत्रक/२०११/६०५३ दिनांक :- 16 JUL 2011

प्रति,

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड/अवसरी
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड
शासकीय तंत्रनिकेतन पुणे/सोलापूर/कोल्हापूर/मिरज/कराड/अवसरी/तासगाव
शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन पुणे
म.रा.हॉटेल मॅनेजमेंट ॲड केटरिंग टेक्नालॉजी पुणे

विषयः- शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तंत्रनिकेतन/ तत्सम संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या कंत्रांटी अधिव्याख्यात्यांना निव्वळ कंत्रांटी तत्वावर पुनर्नियुक्ती देणेबाबत

सदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांचे कार्यालयातील दिनांक १६.७.२०११ रोजीचा दूरध्वनी संदेश

उपरोक्त संदर्भाधिन दूरध्वनीच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील रिक्त असलेल्या अधिव्याख्यात्यांची रिक्त पदे रुपये १२०००/- इतक्य ठोक वेतनावर कंत्राटी स्वरुपात २ वर्षाच्या कालावधीसाठी भरण्यात आली होती. त्यापैकी ज्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा ऑगस्ट २०११ मध्ये समाप्त होत आहेत त्यांना संचालनालयाकडून पूनर्नियुक्ती आदेश देण्यात देण्याची बाब संचालनालयाचे विचाराधीन आहे.

तरी आपल्या संस्थेमध्ये ज्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा ऑगस्ट २०११ मध्ये समाप्त होणार आहे त्यांची अचूक माहिती खालील विवरणपत्रामध्ये न चुकता दिनांक १८-०७-२०११ पूर्वी या कार्यालयास पोहचेल अशा बेताने सादर करण्यात यावी. तसेच सदर माहितीची आगावू प्रत नचुकता संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांना फॅक्सद्वारे सादर करण्यात यावी .

विहित मुदतीत आपली माहिती प्राप्त न झाल्यास, आपली माहिती निरंक समजण्यात येईल व एखाद्या अधिव्याख्यात्यांस पुनर्नियुक्ती न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी .

प्रपत्र

ज्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा ऑगस्ट २०११ मध्ये समाप्त होत आहेत अशा कंत्राटी अधिव्याख्यात्यांना पुनर्नियुक्ती देण्यासंदर्भात गोपनिय अहवालाचे मूल्यांकन व शिफारशी

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कंत्राटी अधि. नाव व पदनात | नियुक्तीचा दिनांक | नियुक्ती समाप्ती दिनांक | गोपनिय अहवालाचे मूल्यांकन | पुनर्नियुक्ती करिता शिफारस आहे किंवा कसे |
|---|---|---|---|---|---|---|

(डी.एन.शिंगाडे )
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे